अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

वर्ष : २४ वे ▸ अंक : १३९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ ।



## सोलापूर

भाजपकडून सपकाळांच्या प्रतिमेला जोडे मार आंदोलन

## नगर

सपकाळांची जीभ कापणाऱ्याला दहा लाखांचे बक्षिस

## काळे फासणाऱ्याला लाखाचे इनाम

# सपकाळांचा ‘तोल’ ढळला ओवेसींनी ‘वाद’ चिघळवला

## वादग्रस्त विधानाने राज्यभर उद्रेक

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करून त्याविषयीचे विधान केल्यानंतर राज्यात संतापाचा भडका उडाला आहे. सपकाळ यांच्या या विधानाचा सर्वत्र निषेध केला जात असून भारतीय जनता पार्टीने राज्यभर मोर्चे काढून रविवारी सपकाळांविरूद्ध आंदोलन छेडले.

एवढ्यावरच न थांबता सपकाळ यांनी परत भडकावू विधान करून आगीत तेल ओतण्याचा उद्योग केला. त्यामुळे आंदोलन आणखीन भडकत गेले. सपकाळ यांना बळ देण्यासाठी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात आणि एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी हे मैदानात उतरून भाजपला जशास तसे उत्तर दिल्याने हा संघर्ष अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

मालेगाव महानगरपालिकेतील समाजवादी पक्षाचे उपमहापौर शान-ए-हिंद यांच्या दालनात टिपू सुलतान यांचे छायाचित्र लावण्यात आल्यानंतर वाद सुरू झाला. शिंदेसेनेच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांकडे धाव घेत, हा फोटो काढण्याची आणि कारवाईची मागणी केली. त्यातच सपकाळ यांनी या वादात उडी घेतल्याने हा वाद पुन्हा उफाळून आला. सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने सर्वत्र संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. सपकाळ यांच्या विधानाचा निषेध म्हणून मालेगावासह राज्यात ठिकठिकाणी भाजपने रविवारी दुपारी आक्रमक पवित्रा घेत सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारले आणि त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन देखील केले.

सपकाळ यांनी म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर त्यांच्या शौर्याप्रमाणेच, त्याच मांदियाळीत टिपू सुलतान आहेत. टिपू सुलतान यांनी इंग्रजांविरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होते. ते भारताचे भूमिपुत्र होते. त्यांनी कधीही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. ते एक शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितले पाहिजे.

### ओवैसींनी भाजपला डिवचले

राज्यातील या टिपू सुलतानच्या वादात आता एमआयएमचे नेते तथा खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी उडी घेतली. ओवैसी यांनी टिपू सुलतान प्रकरणावर भाष्य करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका केली आहे. त्यामुळे आता आणखी नवा वाद पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. ओवैसी म्हणाले, ‘‘टिपू सुलतान इंग्रजांशी लढताना शहीद झाला. टिपू सुलतानने तुरुंगात बसून तुमच्या वीर सावरकरांसारखे इंग्रजांना लव्हलेटर लिहिली नाहीत. तर त्याने तलवार उचलली आणि इंग्रजांपासून आपला देश स्वतंत्र करण्यासाठीच्या लढाईत शहीद झाला. यावेळी त्यांनी टिपू सुलतानकडे जी सोन्याची अंगठी होती, त्या अंगठीवर राम लिहिलेले होते, असे म्हटले आहे. शिवाय त्या अंगठीचा २०१४ मध्ये लिलाव देखील झालाय आता ही गोष्ट खोटी आहे का? असा सवाल करत डॉ. अब्दुल कलामांनी त्यांच्या ‘विंग्स ऑफ फायर’ या पुस्तकात रॉकेट टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून आपण टिपू सुलतानच्या स्वप्नांना पूर्ण करत आहोत, असं लिहिल्याचेही ओवसेंनी सांगितले

### काँग्रेसची पलटवार मोर्चेबांधणी

घटनेनंतर काँग्रेसचे कार्यकर्ते फरासखाना पोलीस ठाणे बाहेर जमले आणि भाजप कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी पोलिसांवर प्रश्न उपस्थित करत, ‘‘वेळीच हस्तक्षेप झाला असता तर हिंसाचार टाळता आला असता,’’ असे म्हटले.

### घरचा आहेर

छत्रपती शिवाजी महाराज देशात नव्हे तर जगात महान असून त्यांची तुलना कुठल्याच राजांशी होऊ शकत नाही, असे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी सपकाळ यांच्या मतांशी फारकत घेताना म्हणाले. पटोले यांच्या या विधानाने सपकाळ यांना घरचा आहेर मिळाला आहे.

### सपकाळांनी शिवप्रेमींची माफी मागावी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना सपकाळ यांनी टिपू सुलतानाशी केली. ही अत्यंत निंदनीय बाब आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना याचा तीव्र निषेध नोंदवत आहे. सपकाळ यांनी महाराष्ट्राची आणि शिवप्रेमींची जाहीर माफी मागावी, असे मनसेने म्हटले आहे.

### सपकाळांची सारवासारव




टिपू सुलतानाच्या वक्तव्यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांनी अखेर मौन सोडले. माझ्या वक्तव्याची मोडतोड करून ‘‘ध’’ चा ‘‘मा’’ करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, असा आरोप सपकाळ यांनी एक्सवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये केला.

### मराठा ठोक मोर्चा आक्रमक

सपकाळ यांच्यासमोरील अडचणी अधिक वाढण्याची शक्यता आहे. सपकाळ यांच्या विरोधात मराठा ठोक मोर्चा आक्रमक झाल्याचे दिसून आले. सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास एक लाख रुपयाचे बक्षीस मराठा ठोक मोर्चाचे सोलापुरातील समन्वयक महेश डोंगरे यांनी हे जाहीर केले आहे.सपकाळ यांच्यामुळेच काँग्रेस संपली असे डोंगरे म्हणाले. त्यांच्या तोंडाला जो कुणी काळे फासेल त्याला एक लाखाचं बक्षीस देणार असल्याचं त्यांनी जाहीर केले. तसेच हर्षवर्धन सपकाळ यांना मराठा समाज रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशाराही देण्यात आला.

### पुण्यात गुन्हा दाखल

टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल तुलनात्मक विधान केल्याने हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर पुण्यात पर्वती पोलीस ठाण्यात दोन समाजात तेढ निर्माण करणारं वक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी हा गुन्हा दाखल केला.

### पुण्यात दगडफेक...

दोन ऐतिहासिक व्यक्तींवरील विधानावरून पुण्यात राजकीय वातावरण तापले असून भाजपच्या आंदोलनादरम्यान दगडफेक झाल्याची घटना समोर आली आहे.या प्रकरणाच्या निषेधार्थ भाजपने पुणे येथील काँग्रेस भवनसमोर आंदोलन केले. आंदोलनादरम्यान काही ठिकाणी दगडफेक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही काँग्रेस कार्यकर्ते जखमी झाल्याची माहिती मिळत असून परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

---

### जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्याचा दबाव

# त्रासाला कंटाळून अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**करमाळ्यात दोघांवर गुन्हा दाखल**

✔ करमाळा/प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध प्रेम संबंध ठेवण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि प्रेमसंबंध न ठेवल्यास बदनामीची धमकी देण्याच्या त्रासाला कंटाळून अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना करमाळा तालुक्यात घडली आहे.

याबाबत सदर अल्पवयीन मुलीच्या पालकाने करमाळा पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून करमाळा तालुक्यातील दक्षिणेकडील एका गावामधील एक २४ वर्षीय व एक अल्पवयीन असे दोन आरोपी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी निर्भया (नाव बदलले आहे) हिला तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करत होते. प्रेमसंबंध न ठेवल्यास तिची बदनामी करण्याची धमकी देवून तिला त्रास देत होते. या दोघा आरोपींच्या या त्रासाला कंटाळून फिर्यादीची मुलगी निर्भया हिने दि.२१ रोजी राहत्या घरात ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

मयत निर्भयाच्या पालकांच्या या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी दोघा आरोपींविरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ सह भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमांन्वये १३ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद केला असून या गुन्ह्यातील २४ वर्षीय आरोपीला ताब्यात घेतले आहे. सहा.पो.नि. गिरीजा मस्के या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# पाकिस्तानला नमवत भारत सुपर-८ मध्ये



✔ **कोलंबो :** महाशिवरात्रीचा मुहूर्त आणि समोर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान... अशा हायव्होल्टेज वातावरणात टीम इंडियाने आपल्या नावाचा डंका वाजवला आहे. श्रीलंकेच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या थरारात सूर्यकुमार यादवच्या यंग ब्रिगेडने पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासोबतच भारताने दिमाखात सुपर-८ मध्ये धडक मारली असून पाकिस्तानच्या विश्वचषकातील आशा आता अधांतरी आहेत.

(अधिक वृत्त पान १२ वर...)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मग काय म्हणते वंदे भारत ‘रिटर्न’ ?


# एटीएस अलर्ट नगरसह राज्यात २१ ठिकाणी छापेमारी, संशयितांची गुप्त चौकशी

✔ अहिल्यानगर/प्रतिनिधी

राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाकडून म्हणजेच एटीएसकडून शनिवारी मध्यरात्रीपासून राज्यभर मोठी समन्वित कारवाई सुरू करण्यात आली आहे.

अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात सात ठिकाणी एकाचवेळी छापे टाकण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. ही कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने करण्यात आली. पहाटेपर्यंत चौकशी सुरू होती. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसली तरी अनेक संशयितांची गुप्त चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एटीएसला मिळालेल्या गोपनीय सूचनेच्या आधारे ही धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे.

मुकुंदनगर परिसरातील काही घरांवर मध्यरात्री छापे टाकण्यात आले. अचानक



मोठ्या संख्येने पोलीस आणि एटीएस अधिकारी पोहोचल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीस दलाच्या बंदोबस्तात ही कारवाई पार पडली.

एटीएसच्या पथकांनी केवळ अहिल्यानगरमध्येच नव्हे तर राज्यातील विविध जिल्ह्यांत एकूण २१ ठिकाणी एकाचवेळी कारवाई केल्याचे समोर आले आहे. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तसेच अकोला जिल्ह्यातील उमरखेड भागातही छापे टाकण्यात आले. या सर्व कारवाया समन्वयाने आणि नियोजनपूर्वक राबविण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

### दहशतवादी कनेक्शनच्या अनुषंगाने तपास जारी

या कारवाईमागे नेमके कारण काय? कोणत्या संघटनेशी किंवा नेटवर्कशी संबंधित तपास सुरू आहे? याबाबत एटीएसकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, संशयित हालचाली, आर्थिक व्यवहार किंवा संभाव्य दहशतवादी कनेक्शन या अनुषंगाने तपास सुरू असल्याची चर्चा आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, काही व्यक्तींचे मोबाईल, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून काहींची सखोल चौकशी करण्यात येत आहे. अनेकांना चौकशीसाठी नोटीस दिली आहे का? याबाबतही अधिकृत पुष्टी नाही. मुकुंदनगरमध्ये अचानक झालेल्या या धडक कारवाईमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या हालचालींमुळे परिसरात अफवांना उधाण आले होते. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. या कारवाईमागील नेमका उद्देश काय? कोणत्या प्रकरणाचा तपास सुरू आहे आणि पुढील टप्प्यात अटक होणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. एटीएसकडून अधिकृत खुलासा झाल्यानंतरच या गूढ छाप्यांचे खरे कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. मुकुंदनगरमध्ये सुरू असलेली एटीएसची कारवाई अजूनही गुप्त ठेवण्यात आली असून पुढील काही दिवसांत मोठा खुलासा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.